# पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता 5 वी), जुलै 2022

बैठक क्र. | | | | | | | | | | | |

संच **A**

**0101**

पेपर क्र. - I

वेळ : 11:00 ते 12:30

## माध्यम : मराठी

एकूण गुण : 150

## प्रथम भाषा व गणित

पृष्ठ : 32

**प्रश्नपत्रिका सोडविण्यापूर्वी कृपया खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :**

(1) या प्रश्नपत्रिकेत **दोन** विभाग आहेत. त्यापैकी विभाग **I** मध्ये प्रथम भाषा विषयासाठी **1** ते **25** व विभाग **II** मध्ये गणित विषयासाठी **26** ते **75** असे एकूण **75** प्रश्न आहेत. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(2) प्रत्येक प्रश्नासाठी **2** गुण आहेत.

(3) प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी एकूण **90** मिनिटांचा कालावधी दिला जाईल.

(4) उत्तरे नोंदविण्यासाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिलेली आहे. प्रत्येक प्रश्नक्रमांकासमोर चार पर्यायासाठी क्रमागत वर्तुळे दिलेली आहेत. त्यातील अचूक उत्तराचा पर्याय क्रमांक असलेले वर्तूळ पुढील उदाहरणात दाखविल्याप्रमाणे रंगवा.
उदा. प्रश्न क्र. **6** च्या बरोबर उत्तराचा पर्याय क्र. **2** असेल, तर तो पुढीलप्रमाणे नोंदवावा.
प्रश्न क्र. **6** ① ● ③ ④

(5) खालीलप्रमाणे नोंदविलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. असे उत्तर नोंदविल्यास त्या प्रश्नास 'शून्य' गुण दिले जातील. ✓① ②̶ ⊙ ④̸

(6) प्रत्येक प्रश्नासाठी एकापेक्षा अधिक वर्तुळात नोंदविलेली उत्तरे, खाडाखोड करून नोंदविलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

(7) एकदा नोंदविलेली उत्तरे पुन्हा बदलता येणार नाहीत.

(8) पर्यायाची उत्तरे नोंदविताना फक्त काळ्या किंवा निळ्या रंगाच्या बॉलपेनचाच वापर करावा. पेन्सिलने नोंदविलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

(9) प्रश्नपत्रिकेत प्रत्येक पानावर खाली व शेवटच्या पानावर कच्चे काम करण्यासाठी मोकळी जागा आहे, तेथेच कच्चे काम करावे.

(10) परीक्षेस मर्यादित वेळ असल्याने एखाद्या प्रश्नाचे उत्तर तुम्हाला येत नसल्यास पुढील प्रश्न सोडवा. शेवटी वेळ शिल्लक राहिल्यास उरलेल्या प्रश्नांसाठी पुन्हा प्रयत्न करावा.

(11) एखाद्या प्रश्नात त्रुटी/चूक आढळल्यास त्याबाबत पर्यवेक्षक किंवा परीक्षा केंद्रसंचालक यांच्याकडे विचारणा करू नये.

(12) प्रश्नातील त्रुटी/चूक/आक्षेपाबाबतचे निवेदन शाळेने किंवा पालकांनी गटशिक्षणाधिकारी किंवा शिक्षणाधिकारी यांच्याकडे लेखी स्वरूपात न पाठवता संबंधित शाळेच्या लॉगीन मधून ऑनलाईन पद्धतीनेच पाठवावे.

(13) त्रुटी/चूक/आक्षेपाबाबतचे निवेदन ऑनलाईन पद्धतीने पाठविण्याची मुदत परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर अंतरिम (तात्पुरती) उत्तरसूची प्रसिद्ध झाल्यापासून 10 (दहा) दिवसांपर्यंत राहील.

(14) मुद्रणदोष किंवा अन्य कारणांमुळे प्रश्न चुकीचा असल्याचे आढळल्यास तज्ञ समितीच्या अभिप्रायानुसार योग्य ती कार्यवाही केली जाईल.

(15) मूळ माध्यमासोबत इंग्रजी भाषेतील प्रश्नपत्रिका दिलेली आहे. मूळ माध्यमातील संदिग्ध प्रश्नांबाबत इंग्रजी प्रश्न पहावेत.

## विभाग - I

**मराठी**

**प्रश्न क्र. 01 ते 03 साठी सूचना –**

उतारा वाचून त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायातून निवडा.

खेडीपाडी आनंदात होती. भीमा, पूर्णा, तापी, कृष्णा सुप्रसन्न वाहत होत्या. सह्याद्री व सातपुडा निवांत पहुडले होते. प्रत्येक घरात नंदादीप प्रशांत तेवत होते. अंगणामधली तुळशीवृंदावने मंजिऱ्यांनी डवरुन डोलत होती. ओसऱ्यांवरील झोपाळे मुलीबाळींनी गजबजून ओव्या गात होते. दुष्काळ ठाऊकच नव्हता. गोठ्यांत गाईवासरांची दाटी होती. सांजसकाळ तुळशीपाशी दिवे लागत होते. गोग्रास घातल्याशिवाय गृहिणी जेवत नव्हत्या. कुणाचीही लक्ष्मी सोन्यामोत्यांवाचून रिती नव्हती. पोरेबाळे, लेकीसुना, शेतेभाते, गुरेवासरे, पशुपक्षी आनंतदात होते. झाडे झुडपे सुद्धा! महाराष्ट्रावर लक्ष्मी प्रसन्न होती.

**01.** खेडीपाडी आनंदात होती हे कोणत्या गोष्टीतून कळते?

अ) नद्या सुप्रसन्न वाहत होत्या.

ब) दुष्काळ ठाऊकच नव्हता.

क) गोठ्यात गाईवासरांची दाटी होती.

ड) महाराष्ट्रावर लक्ष्मी प्रसन्न होती.

(1) फक्त ‘अ’ बरोबर

(2) फक्त ‘ब’ व ‘क’ बरोबर

(3) ‘अ’, ‘ब’, ‘क’, ‘ड’ बरोबर

(4) फक्त ‘ड’ बरोबर

**02.** उताऱ्यात किती जोडशब्द आले आहेत?

(1) दहा (2) बारा

(3) अकरा (4) नऊ

**कच्च्या कामासाठी फक्त**

**03.** 'गोग्रास' या शब्दाचा खालीलपैकी अर्थ कोणता?

(1) गाय गवत खाते.
(2) गाय गवताचा घास घेते.
(3) गाईला गोमाता म्हणतात.
(4) गाईला घातलेला घास.

**प्रश्न क्र. 04 ते 06 साठी सूचना –**

खालील कविता वाचून त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायांतून निवडा.

रंगरंगुल्या, सानसानुल्या, गवतफुला रे गवतफुला!
असा कसा रे मला लागला, सांग तुझा रे तुझा लळा!

मित्रांसंगे माळावरती, पतंग उडवित फिरताना
तुला पाहिले गवतावरती, झुलता झुलता हसताना,
विसरून गेलो पतंग नभिचा, विसरून गेलो मित्राला
पाहुन तुजला हरखून गेलो, अशा तुझ्या रे रंगकळा!

हिरवी नाजुक रेशिम–पाती, दोन बाजूंला सळसळती
नीळनिळूली एक पाकळी, पराग पिवळे झगमगती,
तळी पुन्हा अन् गोजिरवाणी, लाल पाकळी खुलती रे
उन्हामधे हे रंग पाहता, भान हरपुनी गेले रे!

वारा घेऊन रूप सानुले, खेळ खेळतो झोपाळा
रात्रहि इवली होऊन म्हणते, अंगाईचे गीत तुला,
मला ही वाटे लहान होऊन, तुझ्याहूनही लहान रे
तुझ्यासंगती सदा रहावे, विसरूनि शाळा, घर सारे!

**04.** या कवितेत कोणाचे वर्णन केले आहे?

(1) मित्रांसंगे खेळण्याचे
(2) गवतफुलाचे
(3) गवताचे
(4) वारा आणि झोपाळा यांचे

**कच्च्या कामासाठी फक्त**

**05.** कवितेत आलेल्या विशेषण आणि नाम यांची बरोबर जोडी कोणती?

(1) लाल पाकळी

(2) निळे पराग

(3) इवली पाती

(4) काळी रात्र

**06.** खालीलपैकी चुकीचे विधान कोणते?

(1) गवतफुला तुला पाहून मी हरखून गेलो.

(2) तुझे रंग पाहताना भान हरपून गेले.

(3) शाळा, घर विसरुन तुझ्याबरोबर नेहमी राहावे.

(4) मी तुला अंगाईचे गीत गावे.

**07.** खालील वाक्यामध्ये एकूण किती सर्वनामे आली आहेत?

ती त्याला म्हणाली, ''मी तुला त्या घराजवळून येताना पाहिले म्हणून आम्ही थांबलो''.

(1) पाच

(2) सहा

(3) चार

(4) सात

**08.** वचनानुसार गटाशी जुळणारे पद पर्यायातून निवडा.

घडा, सडा, खडा............

(1) घोडा

(2) कडे

(3) झाडा

(4) माड

**09.** खालीलपैकी भविष्यकाळी वाक्य कोणते?

(1) मधुरा पाणी पिते.

(2) माझे जेवण झाले.

(3) मी चांगले भाषण करेन.

(4) तो गावाला गेला होता.

**10.** योग्य विधेय वापरुन वाक्य पूर्ण करा.

जयश्रीने..........

(1) अक्षर सुंदर आहे.

(2) मैदानावर गेली.

(3) इकडे ये.

(4) छान कविता केली.

**कच्च्या कामासाठी फक्त**

**11.** पुढील पर्यायातून शुद्ध शब्द ओळखा.

(1) प्रार्थना (2) प्रार्थणा
(3) पार्थना (4) प्राथना

**प्रश्न क्र. 12 ते 14 साठी सूचना –**

खालील संवाद वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायातून निवडा.

''मामा मामीला सांग पुढच्या महिन्यात 5/6 तारखेला तुमच्याकडे येतोय.''

''कोणाचा फोन होता गं गीता?''

''आई, दीप्तीचा फोन होता. आत्या, दिपू, दीप्ती सगळेच पुढच्या महिन्यात गावी येणार आहेत.''

''अगं, पुढच्या महिन्यात म्हणजे नक्की किती तारखेला येणार आहेत?

''अरेच्या! तारीखच विसरलेगं मी.''

''अगं, लक्षात राहात नसेल तर लिहून ठेवावं.''

''हो बाबा, लिहून ठेवलय. हे बघा. 5 किंवा 6 तारखेला.''

''बघ! बर झालं ना लिहीलस ते.''

**12.** वरील संवादात किती व्यक्तींचा उल्लेख आहे?

(1) पाच (2) सात
(3) सहा (4) आठ

**13.** ''अरेच्या! तारीख विसरलेच गं मी.'' असे गीता कोणाला म्हणाली?

(1) बाबा (2) आई
(3) आत्या (4) दीप्ती

**14.** आत्या, दीप्ती आणि दिपू गावाला केव्हा जाणार आहेत?

(1) 5 तारखेला (2) 6 तारखेला
(3) पुढच्या महिन्यात (4) पुढच्या महिन्यात 5/6 तारखेला

| कच्च्या कामासाठी फक्त |
| --- |
| |

**15.** चौकटीत दिलेल्या अक्षरांपासून तयार होणाऱ्या म्हणीतील 5, 6 व 7 क्रमांकाची अक्षरे घेऊन येणाऱ्या शब्दाचा विरूद्धार्थी शब्द कोणता?

| | | | | |
|---|---|---|---|---|
| व | गु | बा | ला | न |
| शिं | उ | ळा | ढ | |
| व | रा | ता | | |
| ग्या | ग | | | |

(1) नवरी (2) चढण
(3) खाली (4) हुशार

**16.** खालील वाक्य चार भागात विभागले आहे. त्यातील चुकीचा भाग ओळखा.
मडक्यांची | थप्पी | लावली | होती.
(1) मडक्यांची (2) लावली
(3) थप्पी (4) होती

**17.** 'मेज' हा कोणत्या इंग्रजी शब्दाला पर्यायी शब्द आहे?
(1) रेडिओ (2) वेब
(3) फोन (4) टेबल

**18.** खालील वाक्यातील आधोरेखित शब्दाचा समानार्थी नसलेला अचूक शब्द कोणता?
सर्वांनी पाण्याची बचत करावी.
(1) निर्मळ (2) जीवन
(3) सलील (4) जल

**19.** पुढीलपैकी अलंकारिक शब्द ओळखा.
अ) अक्षरशत्रू ब) अनासक्त क) देशभक्त ड) अरण्यपंडित
(1) फक्त 'अ' (2) फक्त 'ड'
(3) फक्त 'अ' आणि 'ड' (4) फक्त 'ब' आणि 'क'

**कच्च्या कामासाठी फक्त**

**20.** 'तिठा' हा शब्द कोणत्या शब्दसमुहाबद्दल आला आहे ते पर्यायातून निवडा.

(1) चार रस्ते जेथे एकत्र मिळतात. (2) तीन रस्ते जेथे एकत्र मिळतात.

(3) घाटातील रस्ता. (4) पुलावरुन जाणारा रस्ता.

**21.** गटात न बसणारा शब्द शोधा.

(1) झाडेवेली (2) झाडेझुडपे

(3) झाडांवर (4) झाडझाडोरा

**22.** पुढील पिलुदर्शक शब्दांची चुकीची जोडी ओळखा.

(1) शेळीचे - करडू (2) म्हैस - कोकरु

(3) घोडा - शिंगरु (4) हरिणी - पाडस

**23.** दिलेली अक्षरे जुळवून अर्थपूर्ण शब्द बनवा व त्या शब्दातील पहिल्या तीन अक्षरांपासून बनलेल्या शब्दाचा अर्थ ओळखा.

भ, अ, व, ति, थी, न

(1) पाहुणा (2) दिवस

(3) सदन (4) घर

**24.** स्वच्छ, स्वागत, स्वार्थ, स्वप्न, स्वरा हे शब्द वर्णानुक्रमे लावल्यास मध्यभागी कोणता शब्द येईल?

(1) स्वच्छ (2) स्वरा

(3) स्वप्न (4) स्विकार

**25.** पुढीलपैकी अचूक जोडीचा पर्याय क्रमांक निवडा

(1) शिक्षण दिन - 11 नोव्हेंबर (2) बालिकादिन - 14 नोव्हेंबर

(3) हुतात्मादिन - 2 ऑक्टोबर (4) विज्ञान दिन - 29 फेब्रुवारी

**कच्च्या कामासाठी फक्त**

**SECTION - II**

## MATHEMATICS

**26.** 5 dozen + 2 gross = ? dozens

(1) 28 (2) 29

(3) 25 (4) 27

**27.** The numbers divisible by 37 are arranged in ascending order. What will be the number at the sixth place?

(1) 148 (2) 185

(3) 111 (4) 222

**28.** If $12^{th}$ August 2017 was Saturday, then which days would occur 5 times in August?

(1) Thursday, Friday, Saturday (2) Sunday, Monday, Tuesday

(3) Tuesday, Wednesday, Thursday (4) Wednesday, Thursday, Friday

**29.** If the difference between two decimal fractions is 4.585 and one of the fractions is 3.256, then what is the other decimal fraction?

(1) 1.329 (2) 7.851

(3) 1.349 (4) 7.841

**30.** Choose the incorrect option.

(1) 100 m = 1 hectometer (2) 1000 $l$ = 1 kilo liter

(3) 1 kg = 10 hectogram (4) 1 gm = 100 decigram

**SPACE FOR ROUGH WORK**

## विभाग - II

### गणित

**26.** 5 डझन + 2 ग्रोस = किती डझन?

(1) 28 (2) 29

(3) 25 (4) 27

**27.** 37 ने विभाज्य असलेल्या संख्या चढत्या क्रमाने मांडल्यास सहाव्या स्थानावर कोणती संख्या येईल?

(1) 148 (2) 185

(3) 111 (4) 222

**28.** 12 ऑगस्ट 2017 रोजी शनिवार होता तर त्या महिन्यात खालीलपैकी कोणते वार पाच वेळा येतील?

(1) गुरुवार, शुक्रवार, शनिवार (2) रविवार, सोमवार, मंगळवार

(3) मंगळवार, बुधवार, गुरुवार (4) बुधवार, गुरुवार, शुक्रवार

**29.** दोन दशांश अपूर्णांकातील फरक 4.585 आहे. त्यापैकी एक दशांश अपूर्णांक 3.256 असेल तर दुसरा दशांश अपूर्णांक कोणता?

(1) 1.329 (2) 7.851

(3) 1.349 (4) 7.841


**30.** खालीलपैकी चुकीचा पर्याय निवडा.

(1) 100 मी. = 1 हेक्टो मी. (2) 1000 ली. = 1 किलो लीटर

(3) 1 कि.ग्रॅ. = 10 हेक्टो ग्रॅम (4) 1 ग्रॅम = 100 डेसि ग्रॅम

**कच्च्या कामासाठी फक्त**

**31.** Find the percentage of the shaded portions in the adjoining figure.



(1) 25 % (2) 4 %

(3) 75 % (4) 7 %

**32.** What is the difference between the smallest 3 digit odd number and the greatest 2 digit even number?

(1) 5 (2) 7

(3) 0 (4) 3

**33.** What is the difference between the first and the last number if 5.435, 5.084, 5.123, 5.064 are arranged in ascending order.

(1) 0.371 (2) 0.351

(3) 0.312 (4) 0.361


**34.** Vijayrao purchased 30 dozen oranges at the rate of Rs. 50 per dozen. 15 oranges were spoiled. He sold the remaining oranges at Rs. 6 per orange. How much profit or loss did he earn in this transaction?

(1) Profit of Rs. 570 (2) Loss of Rs. 570

(3) Loss of Rs. 345 (4) Profit of Rs. 345

**SPACE FOR ROUGH WORK**

**31.** खाली दिलेल्या आकृतीतील रेखांकित भागाची शेकडेवारी काढा.



(1) 25 %　　(2) 4 %

(3) 75 %　　(4) 7 %

**32.** तीन अंकी लहानात लहान विषम संख्या व दोन अंकी मोठ्यात मोठी सम संख्या यामधील फरक किती?

(1) 5　　(2) 7

(3) 0　　(4) 3

**33.** 5.435, 5.084, 5.123, 5.064 या संख्या चढत्या क्रमाने मांडल्यास पहिली व शेवटची संख्या यामधील फरक किती?

(1) 0.371　　(2) 0.351

(3) 0.312　　(4) 0.361

**34.** विजयरावांनी ₹ 50 डझन या दराने 30 डझन संत्री विकत घेतली. त्यापैकी 15 संत्री खराब झाली. उरलेली सर्व संत्री त्यांनी ₹ 6 प्रति संत्रे या दराने विकली. तर त्यांना या व्यवहारात किती नफा अथवा तोटा झाला?

(1) ₹ 570 नफा　　(2) ₹ 570 तोटा

(3) ₹ 345 तोटा　　(4) ₹ 345 नफा

**कच्च्या कामासाठी फक्त**

**35.** If 15 kg 500 gm of rice is filled in a box then how much rice will be required to fill 10 such boxes?

(1) 115 kg (2) 155 kg

(3) 1150 kg (4) 150 kg

**36.** A bottle can contain 125 ml of scented oil. How many bottles will be required to fill 4 *l* of scented oil?

(1) 32 (2) 24


(3) 50 (4) 34

**37.** 3Δ 4□ is completely divisible by 6. Which numbers will occur in place of □ and Δ respectively?

(1) 3, 2 (2) 3, 4

(3) 2, 3 (4) 5, 1

**38.** Which fraction of the following options does not indicate the equivalent fraction of the unshaded portion in the given figure?



(1) $\frac{4}{6}$ (2) $\frac{2}{3}$

(3) $\frac{1}{3}$ (4) $\frac{8}{12}$

**SPACE FOR ROUGH WORK**

**35.** एका डब्यात 15 कि. 500 ग्रॅम तांदूळ भरले तर 10 डब्यात किती तांदूळ मावतील?

(1) 115 कि.  (2) 155 कि.

(3) 1150 कि.  (4) 150 कि.

**36.** एका बाटलीत 125 मिली. सुवासिक तेल भरले. तर 4 लीटर सुवासिक तेल भरण्यासाठी किती बाटल्या लागतील?

(1) 32  (2) 24


(3) 50  (4) 34

**37.** 3 Δ 4 □ या संख्येला 6 ने नि:शेष भाग जातो तर □ व Δ च्या जागी अनुक्रमे कोणते अंक असावेत?

(1) 3, 2  (2) 3, 4

(3) 2, 3  (4) 5, 1

**38.** सोबत दिलेल्या आकृतीतील खालीलपैकी कोणता अपूर्णांक रेखांकित न केलेल्या भागाचा सममूल्य अपूर्णांक दर्शवत नाही?



(1) $\frac{4}{6}$  (2) $\frac{2}{3}$

(3) $\frac{1}{3}$  (4) $\frac{8}{12}$


**कच्च्या कामासाठी फक्त**

**39.** In how many years the principle amount of Rs. 4,000 will get double at the rate of 10 % p.a. by simple interest?

(1) 20 (2) 10

(3) 5 (4) 2

**40.** In the adjoining figure, by how much is the number of triangles more or less than that of number of rectangles?



(1) more by 2 (2) less by 2

(3) more by 4 (4) less by 4

**41.** Which of the following options has the place value of 5, the least?

(1) 54,389 (2) 49,385

(3) 45,389 (4) 74,592

**42.** Choose the incorrect option from the given alternatives.

(1) $\frac{3}{7}$ of 28 = 12 (2) 15 of $\frac{4}{5}$ = 12

(3) $\frac{6}{7}$ of 14 = 12 (4) 18 of $\frac{8}{9}$ = 12


**SPACE FOR ROUGH WORK**

**39.** ₹ 4,000 10% दराने सरळव्याजाने किती वर्ष बँकेत ठेवले असता मिळणारी एकूण रक्कम मुद्दलाच्या दुप्पट असेल?

(1) 20 (2) 10

(3) 5 (4) 2

**40.** खालील आकृतीतील त्रिकोणांची संख्या ही चौकोनांच्या संख्येपेक्षा कितीने कमी अथवा जास्त आहे?



(1) 2 ने जास्त (2) 2 ने कमी

(3) 4 ने जास्त (4) 4 ने कमी

**41.** खालीलपैकी कोणत्या पर्यायातील 5 या अंकाची स्थानिक किंमत कमी आहे?

(1) 54,389 (2) 49,385

(3) 45,389 (4) 74,592

**42.** खाली दिलेल्या पर्यायांपैकी अयोग्य पर्याय निवडा.

(1) 28 ची $\frac{3}{7}$ पट = 12 (2) $\frac{4}{5}$ ची 15 पट = 12

(3) 14 ची $\frac{6}{7}$ पट = 12 (4) $\frac{8}{9}$ ची 18 पट = 12

**कच्च्या कामासाठी फक्त**

**43.** 504 m long wire is cut at 8 places at equal distance. What will be the length of each piece?

(1) 68 m (2) 63 m

(3) 56 m (4) 54 m

**44.** Write the correct option from the given alternatives.

(1) $(20 + 5) \div 5 = 20 \div 5 + 5$ (2) $7 \times 8 + 5 = 5 + 8 \times 7$

(3) $105 \div 3 > 4 \times 9$ (4) $100 \times 10 \div 1 < 100 \div 10 \times 10$

**45.** By how much is the sum of number edges and vertices of a cuboid, more than the difference of the number of edges and faces of a cube?

(1) 8 (2) 12


(3) 14 (4) 6



**46.** Harjeet took a loan of Rs. 20,000 from a bank at the rate of 7 p.c.p.a. for 3 years. How much simple interest will he have to pay to the bank?



(1) Rs. 4,200 (2) Rs. 4,300

(3) Rs. 4,380 (4) Rs. 2,400

**47.** Complete the following series.

 ________

(1)  (2) 

(3)  (4) 

**SPACE FOR ROUGH WORK**

**43.** 504 मीटर तार 8 ठिकाणी कापून तिचे समान तुकडे केले तर प्रत्येक तुकड्याची लांबी किती असेल?

(1) 68 मी.  (2) 63 मी.

(3) 56 मी.  (4) 54 मी.

**44.** खालीलपैकी कोणता पर्याय अचूक आहे ते लिहा.

(1) $(20 + 5) \div 5 = 20 \div 5 + 5$  (2) $7 \times 8 + 5 = 5 + 8 \times 7$

(3) $105 \div 3 > 4 \times 9$  (4) $100 \times 10 \div 1 < 100 \div 10 \times 10$

**45.** इष्टिकाचितीच्या कडा व शिरोबिंदूंची एकूण बेरीज ही घनाच्या कडा व पृष्ठांच्या वजाबाकीपेक्षा कितीने जास्त आहे?

(1) 8  (2) 12


(3) 14  (4) 6



**46.** हरजितसिंगने बँकेतून ₹ 20,000 द.सा.द.शे. 7 दराने 3 वर्षांसाठी सरळव्याजाने घेतले तर त्याला बँकेला किती व्याज द्यावे लागेल?



(1) ₹ 4,200  (2) ₹ 4,300

(3) ₹ 4,380  (4) ₹ 2,400

**47.** खालील आकृतिबंध पूर्ण करा.

 ____________

(1)   (2) 

(3)   (4) 

**कच्च्या कामासाठी फक्त**

**48.** How many times $\frac{3}{4}$ should be added to $\frac{3}{4}$, to get the addition 3?

(1) 4 (2) 3

(3) 5 (4) 2

**49.** In a market, if the cost of 17 boxes of mangoes is Rs. 6,035, then what will be the price of 25 such boxes?

(1) Rs. 355 (2) Rs. 8,875

(3) Rs. 8,625 (4) Rs. 345

**50.** Maria had to reach for a seminar at 10.30 a.m. but her vehicle got punctured and she got late by 45 min. Then at what time did she reach for the seminar?

(1) 11.30 min (2) 11.45 min

(3) 1.30 min (4) 11.15 min

**51.** Which of the following options is incorrect?

(1) Any number multiplied by zero, gives the same number.

(2) Any number multiplied by zero, gives zero as the product.

(3) Any number divided by 1 gives the same number as quotient.

(4) Any number divided by the same number gives 1 as quotient.

**52.** How many 2 digit numbers have 6 in them?

(1) 19 (2) 17

(3) 18 (4) 21

**SPACE FOR ROUGH WORK**

48. $\frac{3}{4}$ या अपूर्णांकात $\frac{3}{4}$ किती वेळा मिळविल्यास बेरीज 3 येईल?

(1) 4 (2) 3

(3) 5 (4) 2

49. बाजारामध्ये 17 आंब्याच्या पेट्यांची किंमत ₹ 6,035 आहे, तर अशा 25 आंब्याच्या पेट्यांची किंमत किती?

(1) ₹ 355 (2) ₹ 8,875

(3) ₹ 8,625 (4) ₹ 345

50. मारीयाला सेमिनारसाठी साडे दहा वाजता पोहोचायचे होते. परंतु गाडी पंक्चर झाल्यामुळे तिला पाऊण तास उशिर झाला, तर ती किती वाजता सेमिनारला पोहोचली?

(1) 11 वा. 30 मि. (2) 11 वा. 45 मि.

(3) 1 वा. 30 मि. (4) 11 वा. 15 मि.

51. खालीलपैकी कोणते विधान अयोग्य आहे?

(1) कोणत्याही संख्येला शून्याने गुणल्यास गुणाकार तीच संख्या येते.

(2) कोणत्याही संख्येला शून्याने गुणल्यास गुणाकार शून्य येतो.

(3) कोणत्याही संख्येला एक ने भागल्यास भागाकार तीच संख्या येते.

(4) कोणत्याही संख्येला त्याच संख्येने भागल्यास भागाकार एक येतो.

52. दोन अंकी संख्येत 6 हा अंक असलेल्या संख्या किती?

(1) 19 (2) 17

(3) 18 (4) 21

**कच्च्या कामासाठी फक्त**

**53.** What remains if 10 is subtracted from 10 % of 200?

(1) 10 (2) 20

(3) 180 (4) 190

**54.** Which of the pairs is neither co-prime nor twin prime?

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 82 | 88 | 71 | 73 | 41 | 43 | 29 | 31 |

(1) 82, 88 (2) 71, 73

(3) 41, 43 (4) 29, 31

**55.** Sameer wrote six lakhs seven as 6000007 by mistake. By how much is his answer wrong?

(1) 54000 (2) 5400000

(3) 600007 (4) 5040000

**56.** $\left(\frac{3}{4}+\frac{5}{6}+\frac{5}{8}\right) = ?$

(1) $5\frac{2}{24}$ (2) $\frac{13}{18}$

(3) $1\frac{3}{18}$ (4) $2\frac{5}{24}$

**57.** A fencing is to be put around a square shape garden with area 625 sq.m. What will be the expenses for a 4 layered fencing around it, if the rate of fencing is Rs. 50 per meter?

(1) Rs. 5,000 (2) Rs. 50,000

(3) Rs. 2,000 (4) Rs. 20,000

**SPACE FOR ROUGH WORK**

**53.** 200 च्या शे.10 मधून 10 वजा केल्यास किती उरतात?

(1) 10 (2) 20

(3) 180 (4) 190

**54.** खालीलपैकी कोणती जोडी जोडमूळही नाही व सहमूळही नाही?

| 82 | 88 |
|---|---|

| 71 | 73 |
|---|---|

| 41 | 43 |
|---|---|

| 29 | 31 |
|---|---|

(1) 82,88 (2) 71,73

(3) 41,43 (4) 29,31

**55.** समीरने 'सहा लक्ष सात' ही संख्या अंकात लिहिताना त्याने चुकून 6000007 अशी लिहिली तर त्याचे उत्तर किती फरकाने चुकले?

(1) 54000 (2) 5400000

(3) 600007 (4) 5040000

**56.** $\left(\frac{3}{4}+\frac{5}{6}+\frac{5}{8}\right)$ = किती?

(1) $5\frac{2}{24}$ (2) $\frac{13}{18}$

(3) $1\frac{3}{18}$ (4) $2\frac{5}{24}$

**57.** 625 चौ.मी. क्षेत्रफळ असलेल्या चौरसाकृती बागेला 4 पदरी कुंपण घालण्यासाठी 50 रूपये प्रति मीटर दराने किती खर्च येईल?

(1) ₹ 5,000 (2) ₹ 50,000

(3) ₹ 2,000 (4) ₹ 20,000

**कच्च्या कामासाठी फक्त**

**58.** Under a tree plantation programme, a social welfare organisation decided to plant trees at 5 km distance on 100 km long road, on both the sides. How many trees can be planted?

(1) 40 (2) 42
(3) 20 (4) 21


**59.** Sandeep has a bundle of notes of Rs. 100 from serial number 42378 to 42432. If instead of Rs. 100 notes, he wants Rs. 500 notes, how many notes of Rs. 500 can he get?

(1) 11 (2) 55
(3) 10 (4) 54

**60.** Aditya incurred Rs. 9,500 expenditure towards travel for his Kerala trip. He spent Rs. 7,250 on miscelleneous expenses. How much did he spend in all for Kerala trip?

(1) Rs. sixteen thousand seven hundred and fifty.
(2) Rs. sixteen thousand five hundred.
(3) Rs. seventeen thousand two hundred and fifty.
(4) Rs. fifteen thousand seven hundred and fifty.

**61.** What is the time in the adjacent clock?




(1) 12 (2) 9
(3) 8 (4) 11

**SPACE FOR ROUGH WORK**

**58.** एका सेवाभावी संस्थेने वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत 100 किमी. लांबीच्या रस्त्यावर 5 किमी अंतरावर एक याप्रमाणे दुतर्फा झाडे लावण्याचे ठरवले तर एकूण किती झाडे लावता येतील?

(1) 40 (2) 42

(3) 20 (4) 21

**59.** संदीपजवळ 42378 क्रमांकापासून 42432 क्रमांकापर्यंत क्रमाने नोटा असलेले 100 रूपयांचे एक बंडल आहे. त्या 100 रूपयांच्या नोटांऐवजी त्यांना 500 रूपयांच्या नोटा हव्या असतील तर 500 रूपयांच्या एकूण किती नोटा येतील?

(1) 11 (2) 55

(3) 10 (4) 54

**60.** आदित्यला केरळ सहलीला जाण्यासाठी साडे नऊ हजार प्रवासखर्च व सव्वा सात हजार रूपये इतर खर्च झाला तर त्याचे केरळ सहलीसाठी एकूण किती रूपये खर्च झाले?


(1) पावणे सतरा हजार

(2) साडे सोळा हजार

(3) सव्वा सतरा हजार

(4) पावणे सोळा हजार

**61.** शेजारील घड्याळात किती वाजले आहेत?





(1) 12 (2) 9

(3) 8 (4) 11

**कच्च्या कामासाठी फक्त**

**62.** Find the perimeter of the adjoining figure if the area of every square is 1 sq. cm.



(1) 22 cm (2) 22 sq. cm.

(3) 12 cm (4) 12 sq. cm.

**63.** 435 × 1 ∗ = 5 ∗ ∗ 0

In this multiplication, ∗ has the same digit. Find the digit in place of ∗.

(1) 0 (2) 1

(3) 2 (4) 3

**64.** Iqbal purchased an old motorcycle at Rs. 25,000. He spent Rs. 8,500 on its repairs, Rs. 2,500 for its colouring and then sold it at Rs. 38,500. How much profit did he earn in the following transaction?

(1) Rs. 13,500 (2) Rs. 2,500

(3) Rs. 2,850 (4) Rs. 1,550

**65.** Which of the following is a correct statement?

(1) The sum of all angles of a square is 180°.


(2) The sum of all angles of a triangle is equal to right angle.

(3) The number of sides of a rectangle is double the number of sides of a triangle.

(4) The sum of all angles of a triangle is half the sum of all angles of a rectangle.

**SPACE FOR ROUGH WORK**

**62.** खालील आकृतीतील प्रत्येक चौरसाचे क्षेत्रफळ 1 चौ. सेमी. असल्यास आकृतीची परिमिती काढा.



(1) 22 सेमी (2) 22 चौ.सेमी.

(3) 12 सेमी (4) 12 चौ.सेमी.

**63.** 435 × 1 ✻ = 5 ✻ ✻ 0

या गुणाकारात ✻ च्या जागी समान अंक आहे तर तो अंक कोणता?

(1) 0 (2) 1

(3) 2 (4) 3

**64.** इकबालने 25,000 रूपयाला एक जुनी मोटरसायकल विकत घेतली. तिच्या दुरूस्तीसाठी ₹ 8,500 व रंग देण्यासाठी ₹ 2,500 खर्च केला व ती गाडी 38,500 रूपयाला विकली तर या व्यवहारात त्याला किती नफा झाला?

(1) ₹ 13,500 (2) ₹ 2,500

(3) ₹ 2,850 (4) ₹ 1,550

**65.** खालीलपैकी कोणते विधान अचूक आहे?

(1) चौरसाच्या चारही कोनांची बेरीज 180° असते.

(2) त्रिकोणाच्या सर्व कोनांच्या मापांची बेरीज काटकोन एवढी असते.

(3) चौकोनाच्या बाजूंची संख्या ही त्रिकोणाच्या बाजूंच्या संख्येच्या दुप्पट असते.

(4) त्रिकोणाच्या सर्व कोनांच्या मापांची बेरीज ही चौकोनाच्या सर्व कोनांच्या मापांच्या बेरजेच्या निम्मी असते.

**कच्च्या कामासाठी फक्त**

**66.** Which is the greatest number?

0.91 | 0.899 | 0.090 | 0.900

(1) 0.91
(2) 0.899
(3) 0.090
(4) 0.900

**67.** To help the flood victims, the students of Adarsh Vidyalaya collected Rs. 47,989 and the students of Saraswati Vidyalaya collected Rs. 8,493. From the total amount if Rs. 50,042 are used for domestic items and remaining amount is used for food packets. How much amount is spent on food packets?

(1) Rs. 6,340
(2) Rs. 6,440
(3) Rs. 5,440
(4) Rs. 5,340

**68.** Which of the following statements is correct?

(1) $25\ \% = \frac{25}{1000}$
(2) 5 % of 20 = 4
(3) 50 % of 50 = 2.5
(4) 0.68 = 68 %

**69.** What is the diameter of a circular ground whose radius is 7.6 m?

(1) 3.8 m
(2) 15.2 m
(3) 14 m
(4) 7.6 m

**70.** 2.25 m cloth is required to stitch a shirt. How much cloth is required to stitch 5 such shirts?

(1) 10.75 m
(2) 11.25 m
(3) 8.75 m
(4) 9.25 m

**SPACE FOR ROUGH WORK**

**66.** पुढीलपैकी सर्वात मोठी संख्या कोणती?

0.91 | 0.899 | 0.090 | 0.900

(1) 0.91 (2) 0.899

(3) 0.090 (4) 0.900

**67.** आदर्श विद्यालयाने ₹ 47,989 व सरस्वती विद्यालयाने ₹ 8,493 पूरग्रस्तांसाठी मदतनिधी गोळा केला. त्यातील ₹ 50,042 घरगुती वस्तूंसाठी व उरलेली रक्कम खाऊच्या पाकिटांसाठी वापरली तर खाऊच्या पाकिटांसाठी किती निधी वापरला?

(1) ₹ 6,340 (2) ₹ 6,440

(3) ₹ 5,440 (4) ₹ 5,340

**68.** खालीलपैकी कोणते विधान अचूक आहे?

(1) $25\% = \frac{25}{1000}$ (2) 20 चा शेकडा 5 = 4

(3) 50 चा शेकडा 50 = 2.5 (4) 0.68 = 68%

**69.** 7.6 मी. त्रिज्या असलेल्या वर्तुळाकार मैदानाचा व्यास किती?

(1) 3.8 मी. (2) 15.2 मी.

(3) 14 मी. (4) 7.6 मी.

**70.** एक शर्ट शिवण्यासाठी सव्वा दोन मीटर कापड लागते. तर पाच शर्ट शिवण्यासाठी किती मीटर कापड लागेल?

(1) पावणे अकरा (2) सव्वा अकरा

(3) पावणे नऊ (4) सव्वा नऊ

**कच्च्या कामासाठी फक्त**

**71.** How much more is the number of divisors of 36, than that of divisors of 24?

(1) more by 1 (2) more by 2

(3) more by 3 (4) more by 4

**72.** What will be the consecutive number after seventy five lakhs nine thousand five hundred and thirty five?

(1) 759536 (2) 7590535

(3) 7509534 (4) 7509536

**73.** Under "Tree Conservation" programme, Maharashtra Government planted 8000 trees on Amravati-Akola and Amravati-Yavatmal Highway, on both sides of the road. If 40 % trees are planted on Amravati-Akola highway, how many trees are planted on Amravati-Yavatmal highway?




(1) 3200 (2) 4200

(3) 1600 (4) 4800

**Instruction for Question No. 74 and 75.**

Observe the pictorial information and answer the questions.

In a village, people have different coloured Ration Cards.

| Colour of Ration Card | No. of houses |
|---|---|
| White |  |
| Yellow |  |
| Orange |  |

Scale : 1 picture = 100 houses

**SPACE FOR ROUGH WORK**

**71.** 36 च्या एकूण विभाजकांची संख्या ही 24 च्या एकूण विभाजकांच्या संख्येपेक्षा कितीने जास्त आहे?

(1) 1 ने (2) 2 ने

(3) 3 ने (4) 4 ने

**72.** पंच्याहत्तर लक्ष नऊ हजार पाचशे पस्तीस या संख्येनंतर येणारी क्रमिक संख्या खालीलपैकी कोणती?

(1) 759536 (2) 7590535

(3) 7509534 (4) 7509536

**73.** 'वृक्ष संवर्धन' कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र शासनाने अमरावती – अकोला व अमरावती – यवतमाळ या महामार्गांला दुतर्फा 8000 झाडे लावली. त्यापैकी शे. 40 झाडे अमरावती – अकोला महामार्गांला लावली. तर अमरावती – यवतमाळ महामार्गांला किती झाडे लावली?




(1) 3200 (2) 4200

(3) 1600 (4) 4800

**प्रश्न क्र. 74 व 75 साठी सूचना –**

खालील चित्ररूप माहितीच्या आधारे प्रश्नांची उत्तरे लिहा.

एका खेड्यातील काही घरांमध्ये खाली दिलेल्या रंगांची रेशनकार्ड आहेत.

| रेशनकार्डाचा रंग | घरांची संख्या |
|---|---|
| पांढरा |  |
| पिवळा |  |
| केशरी |  |

प्रमाण – 1 चित्र = 100 घरे

**कच्च्या कामासाठी फक्त**

**74.** What is the number of houses that have orange colour card?

(1) 800 (2) 400

(3) 200 (4) 600

**75.** How many times is the number of houses with white card to that of the number of houses with yellow and orange colour card?

(1) 3 times (2) $\frac{1}{3}$ times

(3) Double (4) $\frac{1}{2}$ times

**SPACE FOR ROUGH WORK**

**74.** केशरी रेशनकार्ड असलेल्या घरांची एकूण संख्या किती?

(1) 800 (2) 400

(3) 200 (4) 600

**75.** पांढरे रेशनकार्ड असलेल्या घरांची संख्या ही पिवळे व केशरी रेशनकार्ड असलेल्या घरांच्या संख्येच्या किती पट आहे?

(1) 3 पट (2) $\frac{1}{3}$ पट

(3) दुप्पट (4) $\frac{1}{2}$ पट

**कच्च्या कामासाठी फक्त**

**SPACE FOR ROUGH WORK**